
१९६०
म. ग्रं. सं. ठाणे
विषय क्र. २७०
REFBK-0011425





# स्वयंभू चिंतामणि

## चिंतामणीचें कळम्ब

देवराज्य करिता झाला ।
सदा गणेश भजी सबळा ॥
तयाने गणेश स्थापिला ।
वऱ्हाडीं कदबपुरीसी ॥
—श्रीगणेशविजय

२५३५२
२७०

वसन्त गिरटकर

किंमत

REFBK-0011425

नये पैसे
११८२५

वोरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.

श्री : २४६

©१९६०
व्होरा ॲण्ड कंपनी पब्लिशर्स
प्रा. लि. मुंबई २.

*

सांस्कृतिक महाराष्ट्र
दर्शनमाला : ३३
...विदर्भ परिसर

*

आवृत्ति पाहिली १९६०

*

किंमत ६५ नये पैसे

*

महाराष्ट्रांतील सांस्कृतिक केंद्रांचीं ऐतिहासिक पार्श्वभूमीवर रेखाटलेलीं भावरम्य बोलकीं शब्दचित्रें

*

प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि. करिता
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी, मुंबई २.

*

मुद्रक :
ज. ग. जोशी,
जनार्दन प्रेस,
३९४ सदाशिव, पुणें २.

## विदर्भाचें संस्कृति-वैभव

महाराष्ट्राच्या घटकप्रदेशांतील विदर्भ-भूमि अत्यंत प्राचीन आहे. उपनिषत्कालापासून विदर्भाचे गौरवोल्लेख आढळतात. नर्मदा आणि कृष्णा या नद्यांच्या मधल्या प्रदेशांत विदर्भानें प्राचीन काळीं आपला सांस्कृतिक प्रभाव पाडला होता. महर्षि अगस्त्यांच्या तपस्तेजानें उजळून निघालेली लोपामुद्रा, भगवान् श्रीकृष्णाचें हृदय जिंकणारी रुक्मिणी आणि पुण्यश्लोक नलराजासाठीं वनवास पत्करणारी दमयन्ती या विदर्भभमीच्याच कन्या.

इतिहास-काळात सातवाहन, वाकाटक, कलचूरि, चालुक्य, राष्ट्रकूट आणि यादव या सर्व प्रसिद्ध राजकुलांनीं विदर्भाची गौरवशाली परंपरा वर्धिष्णु बनविली. वाकाटकाच्या काळांत तर विदर्भभूमि संस्कृति-वैभवाच्या अत्युच्च शिखरावर होती. गुप्तवाकाटकांनीं भारतीय इतिहासाचें सुवर्णयुग घडविलें—त्या वाकाटकांची राजधानी विदर्भांत नंदिवर्धन (नगरधन) येथें होती. राज्यकर्तृत्व, धर्म, साहित्य आणि कला या संस्कृतीच्या सव अंगाचें विदर्भानें पोषण केलें आहे.

' वैदर्भी रीति ' विदर्भाच्या मातींतूनच फुललेली आहे. महाकवि भवभूति हा विदर्भाचाच पुत्र. महानुभावपंथसंस्थापक चक्रधराचे गुरु गुंडम राऊळ, आदिकवि मुकुंदराज, द्वितीय दत्तावतार श्रीनरसिंह सरस्वती हे मूळचे विदर्भातीलच.

— श्रीरामाच्या पाऊलखुणा उरीं सांठविणारें रामटेक, रुक्मिणी-स्वयंवराच्या मधुर स्मृतींत रंगणारी अमरावती, जैनांच्या परंपरेची जपणूक करणारा मुक्तागिरि, महाकालीची उपासना करणारें चंद्रपूर, श्रीगणेशाच्या आराधनेंत मग्न असणारीं आधाशा आणि कळंब हीं स्थानें, विदर्भपंढरी कौंडिण्यपूर आणि आधुनिक सन्त श्रीगजाननमहाराज यांचें शेगांव या विदर्भातील कांहीं संस्कृतिकेंद्रांचा परिचय या मालेतून करून दिला जात आहे.

दा. क्र.
अनुक्रम 260342 दि. 22/11/60
क्रमांक 2200

# स्वयंभू चिंतामणि

**क ळं ब**

विगताः दर्भाः यस्मात् सः विदर्भः ।

विदर्भ हा अत्यत प्राचीन देश आहे विदर्भ या देश-नामाचा सर्वांत जुन्यांत जुना निर्देश जर कोठें येत असेल तर तो 'बृहदारण्यक' नि 'प्रश्नोपनिषदां'त येतो ऋग्वेदकालातहि त्याचा वापर होता असे दिसतें. तदनतरच्या रामायण, महा-भारतादि ग्रथात तर त्याचा अनेकदा नि अनेक ठिकाणी नाम-निर्देश येऊन गेला आहे. तथापि वऱ्हाड या शब्दाचा 'वराड' या स्वरूपात देवगिरीच्या यादवांच्या अमदानींत तेराव्या शतकांत महानभावांच्या वाङमयांत सर्वप्रथम उल्लेख येतो. त्रिविक्रम-भट्टाच्या 'नलचम्पू'त आणि अकबराचा प्रधान अबुलफझल याच्या

'ऐनई अकबरी' या ग्रंथात वऱ्हाडला "वरदातट" म्हणत असत, असें नमूद केलेलें आढळतें. वररुचीच्या 'प्राकृतप्रकाश' या व्याकरणात दिलेल्या नियमावरून वरदातट याचा अपभ्रंश वरआअड असा होतो आणि यावरूनच वराड हा शब्द सिद्ध झाला असावा, असें विद्वानाचें मत आहे. कालांतरानें या वराड-चेंच वऱ्हाड असे रूप झाले असावे

विदर्भ हा सुसंपन्न नि सुसमृद्ध होता नि आहे. अगस्त्याने विन्ध्याला वाकवून पहिलें पाऊल टाकलें तें इथेंच !... नंतर अरण्यें तोडून ह्यात आर्यांनीं वसाहती वसविल्या. आणि म्हणूनच की काय हा वऱ्हाड सोन्याची कऱ्हाड म्हणून नाणा-वला आहे.

**सारस्वती जन्मभूः** .

विदर्भ विषय सारस्वती जन्मभू म्हणून पुराणकालांत मान्यता पावलेला असा हा वऱ्हाड आहे त्याची परंपरा उज्ज्वल आहे. तो जगन्माता रुक्मिणीचे माहेर आहे मायबोली मराठीचें उगमस्थान आहे. साहित्याची गंगोत्री आहे. महानुभावाचे विद्यापीठ आहे

संस्कृतातील दण्डी, भवभूति आणि राजशेखर हे वैदर्भीय ग्रंथकार जगन्मान्य झाले आहेत. साहित्यशास्त्रातील 'वैदर्भी' रीति ही सर्वश्रेष्ठ गणली गेली आहे.

प्राकृतांतील 'सेतुबंध' व 'हरिविजय' हीं महाकाव्यें आणि मराठींतील 'विवेकसिंधु' नि 'परमामृत' या ग्रंथांची रचनाहि विदर्भांतच झाली आहे.

अशा या विदर्भात अनेक प्राचीन सांस्कृतिक स्थळें आहेत. त्यांत कुंडिनपूर (कौंडण्यपूर), भोजकट (भातुकली), वत्सगुल्म (वाशिम), भद्रावती (भांदक), लोणार, सालबर्डी, रामटेक,

कळब इत्यादींचा समावेश होतो कुडिनपूरला विश्वकल्याणाचें कार्य करणारें विद्यापीठ होतें तेथें परदेशातील विद्यार्थीहि धाव घेत असत ह्युएनत्संग, इत्सिंग, फाहियान आदि प्रवाशांनी याला भेटी दिल्या होत्या आणि याची कीर्ति गात गात ते मायदेशीं परतले होते विदर्भातील अशा पुरातन नगरांपैकींच 'कदम्ब' हें एक क्षेत्र होतें—हल्लीं जें कळब या नावानें प्रचलीत आहे

## गणेशाची प्राचीनता

श्रीगणेशोपासना प्राचीन काळापासून रूढ आहे. ती केवळ भारतातच नव्हे, तर भारताबाहेरहि प्रचलीत आहे. गजाननाच्या मूर्ति मध्यआशिया, खेतान, एन्देर चिनी तुर्कस्तान, तिबेट, इंडोनेशिया, जावा, सुमात्रा, कम्बोडिया, ब्रह्मदेश इत्यादि देशांतहि उपलब्ध झालेल्या आहेत. इतकेंच नव्हे तर अमेरिकेतील मेक्सिको व इतर प्रांतीं फार प्राचीन काळीं गाणपत्य हा पंथ, निदान गणपतीची वैयक्तिक उपासना तरी थोडी फार रूढ होतीच पृथ्वीच्या पाठीवर इतक्या सार्वत्रिक आढळणाऱ्या दुसऱ्या दैवताच्या मूर्ति नाहींत मथुरा-संग्रहालयात गणेशाची नग्न प्रतिमा असून ती अत्यंत प्राचीन आहे.

भारतात एकशेंआठ विनायकांचीं स्थानें आहेत. पैकीं—

स्वस्ति श्रीगणनायकं गजमुखं मोरेश्वरं सिद्धिदं ॥
बल्लाळं मुरुडं विनायकमढं चिंतामणिं थेवरं ॥
लेण्याद्रिं गिरिजात्मजं सुवरदं विघ्नेश्वरं ओझरं ॥
ग्रामे रांजणसंस्थितो गणपतिः कुर्यात् सदा मंगलम् ॥

या मंगलाष्टकांत महाराष्ट्रातील अष्टविनायकांचा उल्लेख आहे. परंतु या अष्ट विनायकांच्या स्थानांत 'कदम्ब' क्षेत्र समाविष्ट केलेले नाही.

ऋग्वेद, मैत्रायणी संहिता, तैत्तिरीय आरण्यक, गणपति-अथर्वशीर्ष, काठकादि उपनिषदें, याशिवाय महाभारत, याज्ञ-वल्क्यस्मृति, बृहत्संहिता, गाथासप्तशति, बोधायन धर्मसूत्र, स्कंदपुराण, पद्मपुराण, लिंगपुराण, अग्निपुराण, शिव व मत्स्य-पुराण इत्यादि ग्रथांतहि गणपती–विनायकाचे कमीअधीक प्रमाणांत उल्लेख आलेले आहेत; आणि गणेश व मुद्गल या गणेशपुराणामध्यें तर सविस्तर वर्णन आलें आहे.

कदंब क्षेत्राचे आणि तेथील चिंतामणीचे सविस्तर वर्णन गणेशपुराण व मुद्गलपुराण या ग्रंथातून आलेलें आहे गणेश-पुराणांत कदंब क्षेत्राचे माहात्म्य वर्णन करणाऱ्या कथा आहेत. येथील चिंतामणीची स्थापना इंद्रानें का केली याबद्दलची पुराणकथा गणेशपुराणांत पुढीलप्रमाणें दिली आहे.

**पुराण-कथा :**

ब्रह्मदेवानें अहिल्या नांवाची एक अत्यत देखणी, रूपवती कन्या निर्माण केली. ती सर्वच देवादिकांना हवी हवीशी वाटू लागली त्यांच्यांत अहमहमिका निर्माण झाली. ती मिळावी म्हणून सारेच देव आपापल्या परी ब्रह्मदेवाची प्रार्थना करूं लागले तेव्हा त्यांनी अट घातली, "जो कुणी सर्वांच्या अगोदर पृथ्वी-प्रदक्षिणा करून येईल त्यालाच ही कन्या मिळेल."

देवराजा इद्र ऐरावतावर बसून पृथ्वी-प्रदक्षिणेस निघाला इतर देवहि निघाले. . इकडे महर्षि गौतमांना हें वृत्त कळलें. ते गगेवरून स्नान करून परत येत होते रस्त्यांतच त्याना प्रसूत होत असलेली सवत्स धेनू दिसली त्याना शास्त्रवचन आठवले–'अशा धेनूची प्रदक्षिणा केल्यास पृथ्वी-प्रदक्षिणीचे पुण्य लाभतें.' त्यानीं लागलीच तिला तीन प्रदक्षिणा घातल्या. नंतर ते ब्रह्मदेवाकडे आले व त्यांनीं सर्व हकिकत निवेदन केली आणि अहिल्येची मागणी केली.

ब्रह्मदेवाला त्याप्रमाणें करणें भाग पडले. गौतमानी अहिल्येचा सहर्ष स्वीकार केला. इतक्यातच इंद्र तेथें उपस्थित झाला. आणि झाला प्रकार त्याच्या दृष्टीस पडला सर्व देव व देवेंद्र हात चोळीत आल्या पावलीं परत गेले.

स्वर्गलोकात देवराजा इंद्र आपल्या सभेंत बसला असतां नारदमुनि तेथें अवतरले. इकडचे तिकडचे क्षेमकुशल झाल्यावर इंद्रानें काहीं कौतुकास्पद घडलें असल्यास निवेदन करावे, अशी पृच्छा केली तेव्हा नारद म्हणाले, " अमरेश्वरा, ऐक. येता येता दंडकारण्यांत तपोनिधि गौतमांचा आश्रम मीं पाहिला त्यात त्यांची पत्नी अहिल्याहि माझ्या नजरेस पडली तिला पाहताच मी देहभान विसरलों. त्रैलोक्यात इतकी सुंदर स्त्री शोधून सांपडणार नाही ! ती नसलेली ही अमरपुरीहि मला तर ओकी ओकी वाटते !"

हें ऐकून इंद्राचे चित्त अस्वस्थ झालें आणि तिच्या प्राप्ती-करिता तो भूलोकावर, जेथें गौतमाचा आश्रम होता, तेथें आला तेथें इन्द्रानें अहिल्येच्या पातिव्रत्याचा भंग केला. त्यामुळें गौतमानी इन्द्राला शाप दिला की, 'तुझ्या अंगाला हजार भोकें पडतील' इंद्राच्या कानी पडते, न पडतें तोंच त्याच्या अंगावर हजारों व्रण उमटले. आणि त्याच्या शरिराला घाण येऊ लागली. .आता महेंद्राला तोंड दाखविण्याचीहि सोय राहिली नाही. त्याची त्यालाच शरम वाटू लागली. म्हणून तो इंद्र-गोप नावाचा किडा होऊन कमलनालात राहूं लागला.

तिकडे सर्व देवादिकाना ही वार्ता कळतांच ते फारच सचिंत झाले ते सर्व गौतमांकडे येऊन क्षमायाचना करूं लागले. गौतमांनी त्याचे आगतस्वागत केले व त्याना त्रास झाल्याबद्दल खेदहि व्यक्त केला आणि त्याना सांगितले की, " मी एक मंत्र सागतो, त्याचा तुम्ही त्याजकडून जप करून घ्या. षडाक्षरी मंत्र महासिद्धि देत असतो. यास्तव, त्या मंत्राचा

उपदेश केला असतां त्याचा देह दिव्य होईल व त्याच्या अंगाला जितके व्रण आहेत तितक्याच नेत्रानीं तो युक्त होईल."

---कदंब वृक्षाच्या खाली परमासनावर बसलेल्या इंद्रानें नासाग्रीं दृष्टि लावून व मनाचा निरोध करून षडाक्षरी मंत्राचा जप केला वायु भक्षण करून इंद्रानें हजार वर्षे अशीं काढलीं. नंतर गजानन प्रसन्न झाले व त्यांनी त्याला दर्शन दिलें. तेव्हां इंद्रानें मोठ्या आदरानें तेथें गणपतीची शुभ, दिव्य व सर्वावयव-सुंदर अशी स्फटिकाची मूर्ति स्थापिली रत्नें व सुवर्ण यांच्या योगानें त्यानें तलावाचे काठीं विस्तृत मंदिर बांधविलें. तेंच हें कदंब क्षेत्रांतील चिंतामणीचे स्वयंभू-मंदिर !

**महान् - द्रष्टा गृत्समद :**

एके दिवशी राजा रुक्मांगद मृगयेसाठी अरण्यात भटकत असतां त्याला एक आश्रम आढळला तो आश्रम वाचन्मुनीचा होता. त्यांच्या पत्नीचें नाव मुकुंदा असे होतें. राजा रुक्मांगदानें उभयतांना नमस्कार केला नमस्काराचा स्वीकार करून तो मुनि स्नानासाठी नदीवर निघून गेला. तहानलेल्या राजानें मुकुंदेपाशीं पाणी मागितले, परंतु दुर्दैवानें राजाला त्या दुष्ट मुनीपत्नीकडून सुखद पाण्याऐवजी दुःखद शाप मिळाला त्या शापानें राजाला पांढरें कुष्ट जडले

काहीं दिवस लोटल्यावर आकाशमार्गानें जाणाऱ्या नारद-मुनीस राजा रुक्मांगदाने पाहिलें राजानें त्यांना नमस्कार करून विश्रांतिसाठीं थांबण्याबद्दल विनंती केली. आणि घडलेली सर्व हकिकत निवेदन करून यांतून सुटण्याचा कोणता तरी मार्ग सांगा, अशी प्रार्थना केली. तेव्हा सर्वज्ञ नारद म्हणाले, "मी येत असतां, मार्गात एक मोठें आश्चर्य पाहिले. विदर्भ देशामध्यें कदम्ब म्हणून एक प्रसिद्ध नगर आहे. त्यातील एका मंदिरात मी विनायकाची शुभ मूर्ति पाहिली. ती चिंतामणि या नावाने प्रसिद्ध असून सर्वांचे सर्व काम पूर्ण करीत असते. त्या मूर्तीच्या

समोर गणेश-पदपूर्वक असें एक महाकुड आहे हे राजा, कोणी एक महाकुष्टी व जरेनें जर्जर झालेला माणूस तीर्थयात्रा करतां करता कदम्ब क्षेत्री आला व त्यानें या गणेशकुडांत स्नान करताच त्याला दिव्य देहाची प्राप्ती झाली."

रुक्मांगदानें त्या ठिकाणी येऊन त्या गणेशकुंडांत स्नान केलें नि काय आश्चर्य! त्याचें श्वेतकुष्ट कुठल्या कुठे नाहीसें झालें! आणि त्याचा देह दिव्य तेजानें युक्त झाला.

पुढें या मुकुन्देलाच कपटवेषधारी इंद्रापासून पुत्रप्राप्ति झाली. त्या मुलाचें नाव गृत्समद असें ठेवण्यात आलें.

हाच गृत्समद पुढें मोठा विद्वान ऋषि झाला.

मगध देशांत मगध नामक राजाचे निमत्रणावरून हा तेथें गेला. तदनतर शास्त्रप्रसगानें गृत्समद आपली प्रौढी सागूं लागताच अत्रिमुनि इतर मुनींसमक्ष त्यास म्हणाले, "तुला धिकार असो! तू जारज क्षत्रिय असा तू! तुला आमच्या सभेंत बोलण्याचा काय अधिकार?" हें ऐकून त्याच्या अगाचा तिळपापड झाला त्याच्या तळव्याची आग मस्तकात पोहोंचली. आणि तो तसाच पाय आपटीत घरी निघून आला.

तदनतर गृत्समदाने पायाच्या एका आंगठ्यावर उभें राहून प्रदीर्घ तप केले त्या तपानें प्रसन्न होऊन श्रीगणेशानें त्याला दर्शनपूर्वक वर दिला की, "ज्या अर्थी–"गणाना त्वा गणपतिं हवामहे" या वैदिक मत्राचा तू जप केला आहेस, त्या अर्थी तू या मत्राचा ऋषि होशील आणि तू ब्रह्मादि देव व वसिष्ठादि मुनि यामध्यें सर्वत्र प्रख्यात होशील प्रारभ केलेल्या सर्व कार्यांमध्यें जे पूर्वी तुझें व नतर माझें स्मरण करतील त्याना सिद्धि प्राप्त होईल" (गणेशपुराण : अ. २८ ते ३७)

त्याप्रमाणे गृत्समद मत्रद्रष्टा झाला ऋग्वेदातील द्वितीय मंडल याच्याच नावावर आहे त्यात ४३ सूक्तें असून मत्रसख्या ४००-वर आहे. ऋग्वेद हा जगातील अतिप्राचीन आणि पहिला

ग्रंथ मानतात. ऋग्वेदांतील द्वितीय मडल हें प्राचीनतर आहे ह्यावरून इतिहासज्ञाचें असे मत आहे कीं, गृत्समद सुमारें वीस हजार वर्षांपूर्वी होऊन गेला असावा

गृत्समद हा ज्ञानी, भक्त, कवि, गणिती, विज्ञानवेत्ता, विणकर आणि कृषिसंशोधक होता "प्राये प्राये जिगीवास. स्याम "—आम्ही प्रत्येक व्यवहारात विजयी झालें पाहिजे, हाच त्याचा स्फूर्ति-मत्र होता. तो महान प्रयत्नवादी होता प्रथमत या भूमींत कापसाची लागवड करण्याचा पहिला यशस्वी प्रयोग गृत्समदानेंच केला. लोकरीच्या कातण्या-विणण्याचा शोध त्यानेंच लावला त्याच्या वसाहतींतील बायामाणसाना कातणे व विणणें उत्तम येई. तो स्वत. शेती करी, विणकाम करी. "माऽहं अन्यकृतेन भोजम्—" दुसऱ्याच्या श्रमावर मीं जगता कामा नये, हें त्याच्या जीवनाचें सूत्र असे त्याच्या काळी षड्विधापैकीं बेरीज व वजाबाकी हे दोनच विधि लोकांना अवगत होते परतु गृत्समदानें गुणाकाराचाहि शोध लावला. त्याचप्रमाणें चद्र-किरणाचा गर्भाच्या वाढीवर विशिष्ट स्वरूपाचा परिणाम होतो, असा त्याचा एक महान शोध पौराणिकानीं नमूद करून ठेवला आहे.

असा हा महान द्रष्टा ऋषि या कळबचाच असावा, असे पू० विनोबाजींचें मत आहे ( 'जीवन दृष्टि')

**कालाय तस्मै नमः ।**

श्रीगणेशाचे 'चिंतामणि' या नावानें वऱ्याच ठिकाणी बरेच अवतार झालेले आहेत. त्या सर्वच ठिकाणाना 'चिंतामणि' क्षेत्र असे संबोधलें जातें. तरीहि पुराणात 'चिंतामणि' क्षेत्र असा दोन क्षेत्रांचाच प्रामुख्यानें नामनिर्देश आला आहे एक चिंतामणि क्षेत्र स्थावर ऊर्फ हल्लींचें पुणें जिल्ह्यातील थेऊर व दुसरें प्रस्तुत कदबक्षेत्र !

यवतमाळहून वर्धा-नागपूरला जाणाऱ्या मोटारमार्गावर पूर्वेस कळंब हें गाव आहे तें यवतमाळपासून चौदा मैलावर व वर्ध्याहून अठ्ठावीस मैलावर असून यवतमाळ व वर्धा ह्या दोन्ही ठिकाणाहून येथें येण्याकरिता तासातासानें पी टी. एस्. च्या गाड्या जात येत असतात. यवतमाळला धामणगाव रेल्वे-स्टेशनहून येता येतें यवतमाळ ते कळंब हा मोटारमार्ग डोंगरातून वळणावळणानें जात असल्यामुळें सभोवारचें अवर्ण-नीय असें सृष्टिसौंदर्य दृष्टीस पडतें पावसाळ्याचे दिवसात येथील निसर्गाला एक आगळाच भव्यपणा येतो.. निळ्या डोंगराच्या हारी दुतर्फा उभ्या असतात. पाण्याचे अवखळ ओघळ डोंगरावरून आराधुरा न पाहता पळत सुटलेले असतात.

आणि यवतमाळहून निघालेले आपण अर्ध्या तासातच कळंबला येऊन पोहोंचतो. मोटार-तळ येण्याच्या आधींच चक्रवती तुमचे मगल गीतानी स्वागत करते. अजूनहि तिच्या जिभेवरची ऋग्वेदातल्या ऋचाची ऋचि कायम आहे

यवतमाळ तहसिलीत या गावाचा पहिला क्रमांक लागतो आज जरी हें गांव लहान असलें, तरी तें पूर्वीच्या काळी फारच मोठें भरभराटलेले नगर असावें, असा तर्क करण्यास काहीच हरकत नाहीं. आहे याहि स्थितीत गाव लहान नाहीं पण काही जुन्यापुराण्या वास्तूची पडझड झालेली आहे कोठें कोठें खिडारें पडलीं आहेत आणि वस्ती विरळ झाली आहे. पूर्वीच्या काळीं हे नगर समृद्ध नि विस्तीर्ण असावें. कारण इथली पाढरी सपन्न आहे. पांढऱ्या मातीचे उंचच उच ढिगारे जागोजाग पडले आहेत. गावाच्या सभोंवतालहि दूरदूरपर्यंत पाढरी आहे. नाव सोनुबाई नि हाती कथलाचा वाळा असा प्रकार हिच्या बाबतीत तरी घडला नाहीं. गावाचा परीघ मोठा असावा पूर्वेस महाल बोरी म्हणून एक खेडें आहे; तिथपर्यंत या गांवाचा विस्तार होता असा एक लोकप्रवाद आहे. कित्येक शेतांमध्यें इमारतीचे

पाये व दगडी चिरे लागतात या गांवाला चवदा चावड्या, बत्तीस महाल आणि बारा मारुती होते असें सांगतात. मारुती सध्याहि अस्तित्वात आहेत. गावाचे भोंवताल अनेक पडकी रिठें आहेत. अजूनहि या गावाला चौदाचावड्याचें कळंब म्हणूनच लोक ओळखतात. यावरूनहि त्याच्या पूर्वीच्या विस्ताराची व वैभवाची कल्पना करता येईल.

याचप्रमाणें त्याच्या प्राचीनत्वाची साक्ष देणारे जुने अवशेष पावलोपावलीं आढळून येतात दगडाचे मोठमोठे कोरीव चिरे, निरनिराळ्या ठिकाणीं खोदकाम करतांना मिळालेल्या भग्न, तशाच सलग मूर्ति इत्यादि गोष्टीचा विचार करता कळंब हें प्राचीन गाव असावें, ह्यात शंका घेण्यास जागाच उरत नाही. येथें कांहीं दिवसापूर्वीं सोन्याचीं नाणीं सापडली होती ती देवगिरीच्या यादवकालांतील आहेत, असें इतिहास संशोधकानीं ठरविले आहे. सध्या ती नाणीं नागपूरच्या पुराणवस्तु संग्रहालयात ठेविलीं आहेत. त्याचप्रमाणें गढींतील माती खणताना चौमुखी गणेशाची एक मूर्ति सापडली होती. ती हल्ली चिंतामणीचे मंदिराचे प्रवेशद्वारावर ठेवली आहे. याच तऱ्हेची एक मूर्ति पाढरकवड्याजवळ केळापूरचें रीठ आहे तेथील पडक्या मंदिरात आहे. कळंब येथें गणपतीच्या कितीतरी मूर्ति जेथेंतेथें पडलेल्या आढळतात त्यातील कांही भगलेल्या आहेत. अशीच एक सलग मूर्ति एका माळ्याचे येथें मिळाली. तीवरील लेखावरून ती बाराव्या शतकातील असावी, असा अंदाज आहे. काही वर्षांपूर्वीं एका रोहिल्याचे घरात माती खणीत असताना एक दगडी चिरा सापडला. त्या दगडावर लेख कोरलेला आहे, तो असा ·



शिलालेख

"दर जमाने हजरती बुऱ्हाण निजामस्या सु ।। अळफ
वाट साळवड डावी नाचण गावु"

अशी मराठी अक्षरें उठावदार, उचवटयाची कोरलेलीं आहेत. याचा अर्थ असा' अळफ म्हणजे हजार हिजरी–इ. स. १५९९ या साली अहमदनगरचा बुऱ्हाण निजामशहा' याचे कारकिर्दीत त्याचे लष्कर इकडे आलें होतें. या लष्कराच्या हालचालीसाठीं म्हणा अथवा प्रवाशाच्या सोयीकरिता म्हणा, हा दगड कळबला जेथून सालोड फकीर आणि नाचणगावाकडे जाण्यास दोन रस्ते फुटतात, तेथें आजकालच्या मैलाच्या दगडाप्रमाणें उभा रोवलेला असावा. त्यावरील अर्ध्यात हाच मजकूर फारशीत लिहिलेला होता. हा खरडून टाकलेला आहे अक्षर ३५० वर्षांपूर्वीचे बाळबोध लिपीत लिहिलेले आहे. पण कांही अक्षरें बरोबर लागत नाहीत प्रवाशाच्या सोयीकरिता आणि लष्करी हालचालीकरितां त्यावेळी असे दगड लावल्याचा हा पहिलाच पुरावा आहे आणि आपण समजत आलो की, ही प्रथा साहेबानेंच प्रथम आणली हा शिलालेख सध्या नागपूरच्या पुराणवस्तु सग्रहालयात ठेवलेला आहे.

कळंब येथें जुन्या विहिरी पुष्कळच सापडल्या आहेत. त्या सर्व दगडानीं बांधलेल्या आहेत त्या अत्यंत अरुंद म्हणजे दोन सव्वादोन फूट लांबीरुंदीच्याच आहेत. अशा विहिरी गावातच सापडल्या असे नाही, तर जवळपासच्या शेतातहि त्या सापडल्या आहेत. अशाच प्रकारची बांधलेली एक विहीर गढीची माती नेल्यानंतर गढीखालीं आढळली म्हणजे ज्या ठिकाणीं आज गढी आहे, त्या ठिकाणीं गढीपूर्वीहि वस्ती होती, हें सिद्ध होतें

हल्ली जी गढी आहे, ती बरीच पुरातन आहे गढीत दगडी चिऱ्यानीं बांधलेली एक पायऱ्याची विहीर होती. त्या विहिरीला नक्षीकाम केलेले दगडी चिरे लावलेले होते. ते हिंदु देवळांचे असावेत. देवळें पाडून त्या चिऱ्यांचा विहिरी-साठी उपयोग केला असावा. सुमारें २५-३० वर्षांपूर्वी चिंता-मणीचे मंदिरासमोरील सभामंडप बांधला त्यावेळेस सरकारचे परवानगीनें ती विहीर उखडवून ते चिरे देवळाचे सभामंडपास लावले. कांहीं शिल्लक राहिलेले चिरे देवळाचे आवारांत खड्डा करून त्यांत ठेवले होते तेहि आता उपयोगात आणले आहेत.

### पहिले रघूजी :

या गढीत नागपूरला राज्य स्थापन करण्यापूर्वी पहिले रघूजी भोसले राहिले होते. त्यानींच या गढीची डागडुजी करून कळंब हें लष्करी ठाणें केलें होतें गढीत बालेकिल्ला म्हणून जो वरचा भाग होता तेथेंच त्याचा राहण्याचा महाल होता तो भाग उध्वस्त झाला असला तरी अद्यापहि कारजें असलेल्या एका विस्तृत टाक्याचे अवशेष दृष्टोत्पत्तीस येतात.

कळंब आणि सभोंवारच्या पंचक्रोशीतील इतर गावांत अशी एक दंतकथा आहे रघूजीची एक आवडती कन्या होती. एकदा काय झाले, रघूजींनीं तिला वचन दिलें– "तू एका दमात जितक्या गांवांची नावे घेशील तितकी तुला बक्षीस !"

त्याप्रमाणे तिनें एका झटक्यात ग्रामनामें उच्चारण्यास प्रारभ केला पण जेव्हा पुष्कळच गावाची नावे आली तेव्हा राजानें तिच्या तोंडावर हात ठेवला व तिचें तोंड बद केलें. त्या झटापटीत तिचा श्वास कोंडून ती गतप्राण झाली हा प्रकार या कळब गढींतच झाला होता, असे सांगतात.

## असती वाचा चक्रवतीला- :

निजामशाही राज्य मोंगलानीं जिंकून घेतल्यावर अकबरानें वऱ्हाडचा एक स्वतत्र सुभा निर्माण केला. त्यांतच उत्तरेस बैतूलपासून दक्षिणेस चद्रपुरापर्यंत म्हणजेच मध्यप्रांताच्या पश्चिमेकडील भागाचा समावेश होत होता. बैतूलजवळील खेरला ऊर्फ खेरडा या सरकारा ( जिल्हा ) खालीं बैतूल, साईखेडा, भैसदेहीपासून तों पवनी, आष्टी, आमनेर, पवनारपर्यंत मुलुख येत होता तसेच वऱ्हाडांतील कळंब सरकारांत पूर्वेस वैरागडापावेतों प्रदेश येत असे ('नागपूर प्रांताचा इतिहास')

वैरागड ही मोठी रत्नपेठ होती. येथें हिऱ्याच्या खाणी असल्याबद्दल व तेथें जडजवाहिराचा मोठा व्यापार चालत असल्याबद्दल 'ऐने अकबरी'त उल्लेख आहे. (पान ३४५-कलकत्ता प्रत) कलकत्त्याहून येथें इग्रज व्यापारी आले असल्याचा उल्लेख भाग ८ मध्यें पहावयास सापडतो. त्याचप्रमाणें कळबच्या दुभत्या म्हशींची ख्यातीहि 'ऐने अकबरीं'त मुक्त कठानें केलेली आहे.

पूर्वीं कळब हें गांव जिल्ह्याचें ठिकाण (सरकारा) होतें. त्यात अदाजें पधरावीस परगण्याचा समावेश करण्यात आला होता त्याचा मुख्य अधिकारी कळब येथेंच रहात असे. मुसलमानकालीन अनेक जुने कागदपत्र दिसून येतात, त्यांत 'सुभे बऱ्हाड पायाघाट सरकार कळम्ब परगणे . ' असें वर्णन आढळतें.

हा भाग इंग्रजाचे ताब्यांत आल्यावर त्यांनीं आपली राज्य-व्यवस्था निराळ्या पद्धतीवर आखली त्यामध्यें मुख्य प्रांत, त्या प्रांताचे जिल्हे, जिल्ह्याचे पोटविभाग तालुके, तालुक्याचे परगणे आणि परगण्याचे गाव असा क्रम आखण्यात आला. हल्लींच्या पद्धतीप्रमाणें कळंबचें महत्व नष्ट झाले व नुसतें गांव म्हणूनच त्याचें महत्त्व राहिलें हल्ली कागदपत्रात मौजे कळंब, प्र कळंब ता जि यवतमाळ, प्रांत वऱ्हाड अशा रीतीने त्याचा उल्लेख करण्यात येतो.

कळंब हें परगण्याचें ठिकाण आहे. परगण्याचे देशमुख, देशपांडे हे अधिकारी बहामनी राजाचे काळापासून अस्तित्वात असलेले दिसून येतात कळंबची देशमुखी पारवेकर देशमुखाचे जें घराणें आहे, त्याचेकडे होती. त्याना औरगजेबानें दिलेली सनद आहे. तींत कळंबचे देशमुखीचा उल्लेख असून असें म्हटले आहे की, 'पूर्वीपासून तुमचें जें वतन चालत आलें आहे, तेंच मी तुमचेकडे कायम ठेवतों.' यावरून असें दिसून येतें कीं, औरगजेब बादशहाचे आधीपासून कळंबची वतनदारी पारवेकर देश-मुखांचे घराण्यात होती.

मोगल बादशहाचे कारकिर्दीनंतर वऱ्हाडबरोबरच कळं-बचा भागहि इ. स. १७२४ च्या फत्तेखडर्याच्या लढाईनतर हैद्राबादच्या निजामशहाकडे गेला व १८५३ साली तो निजामा-कडून इंग्रजाकडे आला.

कळंबचे दक्षिणेस सरासरी सात मैलावर द्रुग नावाचा एक पहाडी दुर्ग (किल्ला) आहे त्याच्या भिंतीची रचना आणि तेथें असलेल्या उध्वस्त देवळाचे अवशेष याचे सूक्ष्म निरीक्षण केले असता तो निदान दोन हजार वर्षांपूर्वीचा असावा असा तर्क करावयास काहीच प्रत्यवाय उरत नाही या ठिकाणी गोड राजाचाहि अमल असावा, असे त्या किल्ल्यातील अवशेषांवरून सहज वाटतें

कळंबचे पश्चिमेस नदीकाठी एक व गांवांत मशिदीसमोर एक अशा दोन मुसलमान अवलियाच्या कबरी आहेत ह्या दोन कबरी आणि कळंबहून चौदा मैलावर असलेल्या राळेगाव या गांवी तळ्याचे कांठी असलेली दोंदाबाच्छाची कबर ह्या मुसलमानांचा अंमल इकडे प्रस्थापित होण्यापूर्वीच्या म्हणजे बारावे शतकापूर्वीच्या असाव्यात असे म्हणतात

बहामनी राजाच्या कारकिर्दीत कळंबचा भाग गोंड राजाचे राज्यात होता त्याच्यातर्फे कळंब येथें ठाकूर पदवी असलेले घराणें व तसेंच माहूर येथील ठाकूर पदवी असलेले घराणें राज्य करीत होतें. चंद्रपूरच्या गोंड राजाकडून आणि या 'ठाकुरां'कडून खंडणी न वसूल झाल्यामुळें बादशहानें चंद्रपूर, माहूर व कळंब या भागावर स्वारी केली. बादशहानें कळंबचे ठाकुराला जीवदान देण्याचे अभिवचन दिले होते पण खंडणी हातात पडताच त्यानें तें पाळलें नाही व विश्वासघात करून ठाकुराला जिवंत मारलें बायका-मुलाना पकडून जबरदस्तीनें मुसलमान केलें. .... याविषयीं महमूदशाही वगैरे फारशी इतिहासात असे नमूद केलें आहे कीं. कळंब आणि कळंबचे भागात १०,००० हिंदूची कत्तल करण्यांत आली.


सुमारें चाळीस वर्षांपूर्वी यवतमाळ ते वर्धा सडक तयार करण्यांत आली. ती तयार करीत असताना मोटारतळाच्या जवळपास खोदकाम करताना एक जुनी विहीर लागली. ती उकरली असता, ती संपूर्ण विहीर माणसाच्या अस्थींनी भरलेली दिसून आली. त्याचप्रमाणे थोडक्याच दिवसापूर्वी मोटारतळाच्या जवळच उत्तर बाजूला एका गोवाऱ्याचे घरी एक विहीर लागली त्यानें ती खोदली असतां तिच्यात काही हाडें आढळून आली. हीं हाडें वर वर्णन केलेल्या हिंदूच्या कत्तलीच्या वेळचीच असली पाहिजेत प्रेतें विहिरीत टाकल्यानेंच ह्या विहिरी बुजून गल्या असाव्यात किंवा किती तरी माय-बहिणीनीं अब्र

वाचविण्यासाठीं या विहिरीचा आश्रय केला असा वा आणि नतर त्या बुजविण्यात आल्या असाव्यात, असा तर्क आहे

.. अशा काळचा आठवणींचें रान म णसाच्या मनापुढें जागें झाले कीं, माणूस विषण्ण होतो. आणि त्याच्या अत करणाच्या घरट्यांतले मनाचे पाखरू दु खाने झुर लागतें नि वाटतें–जर या चक्रवतीला वाचा असती, तर तिनें हा दु खद इतिहास डोळे भरभरून खचीत सागितला असता. ण कुणी सांगावे? खळखळ आवाज करणारें पाणीच तर ती करुण विलापिका गात नसेल ! !

### चिंतामणीचें दर्शन :

आपण मोटारतळावर उतरलों कीं आपल्याला फा र लाब जावेच लागणार नाही. उत्तरेकडे गांवात जाण्यासाठीं निघावें, सडक ओलाडावी, तोच आपल्या उजव्या हा ताला शासकीय ज्येष्ठ मूलो-द्योग शाळेची इमारत दिसते आणि थोडें पुढें गेलों कीं तिच्या मदिर !–पण एक आलेच गोष्ट आहे आपण मदि राच्या अगदीं जवळ जाऊ तेव्हाच कुठें कुणी पुट-पुटेल–'हेच तें मदिर !' कारण मदिराची बांधणी खूप खोलांत असल्यामुळें त्याचा कळस विशेष उच्च दिसत नाही मदिर उच्च




चिंतामणीमंदिराचा कळस–प्रवेशद्वारातून

आहे, नाही असे नाही, पण जमिनीच्या सपाटीपासून तें ३३ फूट खोलात आहे आणि आजूबाजूचा सर्व भाग उच्च आहे. यावरून पुराणात वर्णन केल्याप्रमाणें येथें पुराणपूर्वकालांत सरोवर असावे, या म्हणण्याला पुष्टीच मिळते.


हा भाग इतका खोल असल्यामुळें साहजिकच जास्त पावसाळा झाल्यास येथें पाणी साचते व काही दिवसानी तें क्रमाक्रमानें कमी होतें पण कोणत्याहि गोष्टीला धार्मिक अवगुठन देण्याच्या पुराणकारांच्या नेहमीच्या पद्धतीने त्यानी पुराणांत असे वर्णन केले आहे की, ज्या दिवशीं इद्रानें मूर्ति स्थापन केली, त्या दिवशीं श्रीचिंतामणीच्या पादप्रक्षालनाकरिता इथें स्वर्गगा येन असते हा प्रकार गतवर्षींहि घडून आला होता. अशा वेळेस देवाची पूजा-अर्चा पाण्यांतून जाऊनच करावी लागते.

मदिराची बाधणी अत्यत साधी आहे. मदिरासमोरच दर्शनी बाजूस उजव्या हाताला चौमुखी गणपतीची मूर्ति ठेवली आहे. एकाच पूर्ण दगडात--पण चारहि बाजूना चार गणेशमूर्ति, हें ह्या मूर्तीचे वैशिष्टच आहे. नतर आपण २९ पायऱ्या उतरून खालीं जाऊ या. तेथें समोरच चवबाऱ्याच्या मध्यात जें चौकोनी कुड बाधलेलें आहे, तेंच तें पावन तीर्थ ! याला जिवत झरे आहेत याच्या पाण्यात कुष्ठादि चर्मरोग नष्ट करण्याचें सामर्थ्य आहे... समोरच गाभाऱ्यात




प्रवेशद्वाराजवळील चौमुखी गणेशमूर्ति

चिंतामणीची लाब उदर सुढलेली मूर्ति दृष्टीस पडते. ती पाहतांच आपलें मस्तक विनम्र होतें आणि मनींची चिंता चिंतामणीच्या दर्शनाने दूर दडी मारते आपण एका आगळचाच वातावरणांत प्रवेश करतों .



श्रीचिंतामणि-मूर्ति

चिंतामणीच्या दोन्ही बाजूना दोन शकराच्या पिंडी आहेत वरून देवळात येण्यासाठीं एकच रस्ता नसून तीन रस्ते आहेत. नि त्या तीनहि रस्त्याना पायऱ्या आहेत चारहि बाजूच्या भिंती दगडानी मजबूत बांधलेल्या आहेत हें देवालय केव्हा




चिंतामणिमदिराचा परिसर

व कोणी बांधलें असावे ह्याविषयीं काहीच माहिती उपलब्ध नाहीं समोरचा सभामंडप नवीन व मजबूत बांधलेला आहे

देवळाचा परिसर मोकळा व हवेशीर आहे सभोवताल विटांच्या ठेंगण्या भिंती आहेत तीन बाजूनीं मजबूत चाळी बांधलेल्या आहेत. एक पूर्वीची असून दोन नवीन आहेत. समोरची चाळ भाड्यानें दिली जाते. दोन्ही बाजूच्या दोन इमारतीत सध्या हायस्कूलचे वर्ग घेण्यात येतात हायस्कूलला नावहि ' चिंतामणि विद्यालय ' असे औचित्यपूर्णच दिलें आहे

अनसूया :

चिंतामणीच्या मंदिराला लागूनच पश्चिमेला पूर्वाभिमुख असे देवी अनसूयेचें मंदिर आहे मंदिराच्या गाभाऱ्यात डोकावताच काळ्या घोटीव शिसवी पाषाणाची मूर्ति आपले लक्ष सत्वर आकर्षित करून घेते ही अनसूयेची मूर्ति अति देखणी आणि रेखीव असून उत्कृष्ट शिल्पकलेचा एक सुंदर नमुना आहे शिल्पाच्या कारागिरीत खोट लावायला मुळीच जागा नाहीं पाषाणासारख्या कठीण माध्यमात एवढी बारीक कलाकुसर तो अज्ञात कलावंत कसा करू शकला असेल, हें जावें त्याच्या वंशा तेव्हा कळे ! या अनसूयेला चार हात असून तिनें प्रत्येक हातात काही ना काही वस्तू धारण


अनसूयेची मूर्ति

केली आहे वरील उजव्या हातात शंकराची पिंडी, खालचे उजवे हातात रुद्राक्षाची माळ आणि वरील डाव्या हातात विनायकाची मूर्ति असून त्याचप्रमाणें त्याखालील हातात कमंडलू अशा वस्तू आहेत डोक्यावर मुकुट आहे व दोन बाजूला दोन दासी किंवा अप्सरा आहेत. मूर्तिशास्त्रावरील ग्रंथातील आधारावरून ही देवीची मूर्ति पार्वतीचीच असावी, असे सुप्रसिद्ध इतिहास संशोधक डॉ य खु देशपांडे यांचे साधार मत आहे. प्रस्तुत मूर्ति सध्या ती जेथें आहे तेथील आवारातच जागा खोदत असता मिळाली असे सांगतात. अशा तऱ्हेच्या चांगल्या मूर्ति मुद्दामहि कुणी तरी गाडून ठेवल्या असण्याचाच जास्त संभव आहे आणि त्यामुळेंच त्या आपल्या दृष्टीस तरी पडतात नाहीतर काळाच्या ओघात त्यांची काय गत झाली असती हें कोणी सांगावे ?

– याच देवीच्या मंदिराला समांतर असें एक महादेवाचे देऊळ आहे. या देवळात फक्त एक शिवाची पिंडी आहे याच आवारात एक हात लांबीरुंदीची विहीर आहे

## कलावंतिणीचा महाल :

कळंबहून राळेगावला जाणाऱ्या मोटारमार्गावर जवळच एक फर्लांगावर उजव्या हाताला एका शेतात एक ठिकाण 'कळवांतीणचा महाल' म्हणून दाखवितात. सध्या तेथें शेताशिवाय कांहीच नाही. फक्त मोठमोठे दगडी चिरे पडलेले आहेत. शेतात खोलात गाडून असलेलेहि बरेच चिरे आहेत म्हणतात. जे वर औताला लागत होते, ते शेताचे मालकानें खोदून वर काढले आहेत कांहीं चिरे कबरीच्या आकाराचे खोदलेले आहेत दोन तीन चिऱ्यावर फारशीत उचवट्याचीं अक्षरें असलेले लहान लहान लेखहि कोरले आहेत.

या महालांतून परभारें गढीत जाण्यासाठीं भुयार होते. त्याचे तोंड आत्ता आत्तापावेतो उघडें होतें, असे सांगतात. भुयाराच्या खाणाखुणा अजूनहि दिसून येतात

का कुणास ठाऊक, पण या जागेवर एक उदासीनतेचे गभीर सावट पडलेलें दिसते. मन विषण्ण होतें त्या प्रेमिकांच्या पाऊलखुणा अजूनहि त्या भुयाराच्या वाटेवर दिसू लागतात. आणि मनात येते---ते दोन जीव अजूनहि तर या ठिकाणी अज्ञातपणें वास करीत नसतील ?

'असती ज्याच्या जित्या वासना मरणें त्यांना मना ।'

## तपेश्वराचें मंदिर :

गावाच्या पश्चिमेस चक्रवतीच्या ऐल तीरावर तपेश्वराचें मंदिर आहे. देवळात महादेवाची पिंडी असून इतरहि भग्नमूर्ति इतस्तत पडलेल्या आहेत. त्याचप्रमाणें तपस्व्यांच्या काहीं समाध्याहि आहेत.

शकराची पिंडी सुमारें ५-६ फूट खोलात असून सभोंवतालचें टाके विटांनीं बांधलेले आहे त्याविषयी तेथील लोकाचा असा एक समज आहे की, पावसाळ्यात ज्या वेळेस शेतकऱ्याचे डोळे पावसाचे अभावी आभाळाकडे लागतात, त्यावेळेस तें टाकें प्रतिष्ठितानीं पाण्यानें पूर्ण भरून टाकावें. पाणी वरून वाहू लागून जर नदीपर्यंत धार गेली, तर सध्याकाळपर्यंत हटकून पाऊस पडतो.

## कागद डोह :

आपण तपेश्वराचें मदिर बघून थोडे पुढें गेलों कीं जवळच 'कागद डोह' दाखविला जातो. चक्रवतीला असणाऱ्या या डोहाला आता तरी डोह म्हणता येणार नाहीं. कारण डोह

म्हटला कीं, आपण तेथें खूप खोल पाण्याची अपेक्षा करणार, पण तसें येथें नाहीं परंतु येथें मुळीच पाणी नाही असेहि नाही. बारमहा पाणी असतेंच, पण तें नावाचेंच !

याला ' कागद डोह ' असे नाव पडण्याचे कारण, फार पूर्वीच्या काळी या ठिकाणीं कागद तयार करीत असत, असे सागतात. वैशाखाचे महिन्यांत इथले पाणी आटल्यावर काहीं मोठमोठे दगड उघडे पडतात. त्याना उखळासारखे खड्डे आहेत. त्यातच कागदाचा लगदा कुटीत असत, असें दिसतें. हा कागद तयार करण्याचा उद्योग येथून कसा नष्ट झाला, याविषयी एक दतकथा येथील लोक बाहेरून येणाऱ्या प्रवाशाना सागतात.

नदीचे काठावर धदा-चालकाचे घर होतें. तेथेंच कागद तयार करण्याला लागणारी साधनसामुग्रीहि होती एके दिवशीं काय झालें—चक्रवती मालकाच्या स्वप्नात गेली. नि म्हणाली, ' हें पहा. तू आपल चबूगबाळ उचल नि कुठेंहि जा. '

' माई, मी तुझ्या दुधावर पोसलों लहानाचा मोठा झालों. आता कुठ जाऊ ? ' तो मालक तिच्याशी स्वप्नातच बोलला.

' तू माझ ऐक नाहींतर हकनाहक प्राणाला मुकशील. मिजास करू नकोस. उद्याला रात्रीं मोठा पूर येणार आहे ' चक्रवती इतकें बोलून अदृश्य झाली

त्यानें रात्रीच्या स्वप्नावर विश्वास ठेवला नाहीं. त्यानें त्याच्याकडे कानाडोळा केला. चक्रवतीचें ऐकलें नाहीं नि जें व्हायचे तेच झालें !

दुसरे दिवशी गावकऱ्यानीं पाहिलें तर तेथें ना त्याचे घर, ना दार ! रात्रींच्या पुरानें तिथें कशाचेच नामनिशाणहि ठेवले नव्हते. राहिले होते ते लगदा कुटावयाचे दगड !

## बासरीवाले :

आपण आता कागद डोह पाहिलाच चला, आतां इकडनेंच सिद्धेश्वरला जाऊ या. हो, पण जाता जाता वाटेंतल्या ह्या कबरी बघून घेऊ.

येथें तशा इतर मुसलमानांच्या पुष्कळच कबरी आहेत. पण त्यापैकी प्रमुख नि सुदर अशी जी कबर, तीच बासरीवाल्या बाबाची. हे बासरीवाले तीन वर्षांपूर्वी वारले. ते येथें आले तेव्हां त्याना नुकतीच मिसुडाची कोर फुटत होती. उभी हयात त्यानीं इथेंच घालविली पण त्याचा पाय तसा जागेवर रहात नसे ते मुरली फारच छान वाजवीत, असे त्याना पाहणारीं माणसे सागतात भल्या पहाटे उठून ते चक्रवतीचे स्नान करीत नि नतर सुरू होई त्याचें मुरलीवादन ! सारा गाव त्या बासरीच्या सुदर स्वरानी साखरझोपेंतून खडबडून जागा होई.

येथील लोक त्यांचे निरनिराळे चमत्कार सागतात त्याचा विशेष म्हणजे त्याना हिंदु नि मुसलमान या दोन्ही धर्माचे लोक सारखेच मानीत.

## सिद्धेश्वर :

गांवाच्या ईशान्येस मोटारतळाहून एका हाकेच्या अतरावर सिद्धेश्वर आहे हें शिवालय पश्चिमाभिमुख असून आंत काळ्या घोटीव पाषाणाची पिंडी आहे या पिंडीचें खोदकाम फार पुरातन असावे असे वाटतें पिंड साधीच असली तरी–साध्याहि विषयात आशय मोठा आढळतो शिवाच्या पिंडीवर नाग कोरलेला कुणाच्या पाहण्यात आहे किंवा काय ?–परतु माझ्यातरी पाहण्यात आजपर्यंत आला नव्हता. इथल्या पिंडीवर मात्र पळता नाग कोरलेला आहे. या पिंडीवरील लिंग पांढऱ्या गारेचें आहे. तें मूळचें नसावे पहिलें हरवल्यानतर हें बनवून घेतले असावें.



सिद्धेश्वरमंदिर

समोरच्या नंदीचे कोरीव काम वाखाणण्यासारखें आहे. अंगावरच्या झुलीवरील कलाकुसर व गळ्यातील घुंगरू - कठीण प्रस्तराचे माध्यम असताहि सत्याचा आभास निर्माण करतात. आणि आपण त्या अज्ञात कलाकाराला मनातल्या मनात शतश धन्यवाद देतो नंदीची दोन्ही शिंगें तुटलेली आहेत, पण एक जोडलेले असून दुसरें खंडितच आहे.

याचप्रमाणें देवळात एक पाचा फण्याच्या नागाची सुंदर प्रतिमा कोरली आहे. ती पाढऱ्या गारेची आहे. तशीच एक देवीची मूर्ति आहे आणि डाव्या बाजूला सोंड असलेली गणेश-मूर्तिहि आहे. काही गणेशमूर्ति निंबाचे झाडाला लावून ठेवल्या आहेत. भगलेल्या मूर्तींना तर तोटाच नाही.

उतारूच्या सोयीसाठी इथें एक पाकशाळा बांधलेली असून तिथें रहाण्याची व स्वयंपाकाची व्यवस्था होऊं शकते.

या मंदिराच्या व्यवस्थेचे कामकाज श्री. पारवकर देशमुख याचेकडे असून त्याच्याकडूनच सालीना तीनशें रुपये वर्षासनावर एक पुजारी येथें ठेवलेला आहे.

पारावर खाली पाय सोडून देवाचिये द्वारीं क्षणभर बसावे. समोरून चक्रवतीचा प्रवाह चक्राकार गति घेत घेत वळणा-वळणानें वाहताना दिसतो उजव्या हाताला असणारा नाला चार महिनेच चालत असतो. मागें मान मुरडून पहावें–डोंग-राच्या निळसर, हिरव्यागार हारी मनाला चेटुक करतात. पावसाळ्यात पायाला चाळ बांधून नाचणारे झरे, हिरव्या कुरणी बागडणाऱ्या सुंदर हरणी इथल्या रानचे वारे कानात भरले, की माणूस चकव्यानें भुलवल्यासारखा बेभान होतो. आणि त्या निसर्गदृश्याच्या मागें मागे धावू लागतो–झपाटल्या-सारखा !

**निरंजन माहूर :**

आपली झपाटली अवस्था तशीच कायम ठेवू या. तें पहा, तें त्या उंच उंच टेकडीवर . तें पांढरे शुभ्र मंदिर



निरंजन माहूर


दिसतें आहे त्या तिकडे, तें पलीकडे येथून तें तीन मैलावर आहे इथपर्यंत आलोंच, तर आता आपल्याला हें स्थळ पाहिल्याशिवाय परत फिरतां येणार नाही.

"होय, तेंहि खरंच. नतर उगीच रुखरुख नको मनाला. चला—"

वनातील नानाविध सौंदर्याचें पान करीत, फुललेल्या फुलोराचा उत्फुल्ल गध आस्वादीत, आपण निरंजन माहूर बघू आपण तिथपर्यंत कसे पोहोचलों ह्याचें भानहि उरणार नाहीं आपणाला श्रम सार्थकी लागतील थड वाऱ्याच्या झुळुकेनें अग शहारून येईल. आणि झालेल्या श्रमांचा परिहार होईल.

गाव फारच लहान आहे. पाचपन्नास घराची वस्ती.

गडावर चढण्यासाठीं पायऱ्या आहेत वर पर्वताच्या शिखरावर दोन मदिरे आहेत. येथून दिसणारें सृष्टिसौंदर्य



निरंजन माहूरच्या गडावरील
शिवालय आणि अनसूयेचें मदिर

पाहिलें कीं वाटतें, देव मंदिरांत नसून या सौंदर्यात चराचरात भरलेला आहे. आणि मग कळतें की, पूर्वीचे आपले पूर्वज हे किती सौंदर्यवादी होते, व त्यानाहि हेंच मान्य होतें—निसर्ग नि देव एकच !

मोठें माहूर आपणा सर्वांच्या परिचयाचे आहे. त्याच-प्रमाणे हेहि दत्ताचे ठिकाण म्हणून प्रख्यात आहे येथें दत्त-जयंतीला नि विजयादशमीला भाविकांची बरीच गर्दी जमते. यथें मठ असल्यामुळें उतारूच्या उतरण्याची व राहण्याचीहि व्यवस्था होऊ शकते.

बेटाबेटातून वाहणारे निळे सावळे झरे निरखीत हिरवीगार मखमल पायाखाली तुडवीत आपण चालू लागतो मग चक्रवती तुम्हाला सामोरी येते तिच्या काठाकाठानें पाचूचं हिरवीं बेटें पायाखाली घालीत, लवचिक लव्हाळयाच्या गुद गुल्या सहन करीत आपण मोटार तळावर येतो.

**पोळझगडा :**

मोटार तळाच्या अगदी जवळच आपल्याला एक पाढऱ्या मातीचा उच नि भव्य ढिगारा दिसतो. त्यालाच पोळझगडा असें नाव आहे पूर्वी येथें पोळयाचे पाडव्याला दगडमार व्हायची. दोन बाजूला निम्मे निम्मे गडी वाटून घ्यावयाचे व एका पक्षाकडील गडयानी दुसऱ्या पक्षाकडील गडयाना दगड मारावयाचे! एखाद्याला दगड लागून जर तो जखमी झाला व खाली पडला तर त्याला चिंतामणीचें मदिरात नेवून देवा-पुढें ठेवायचें. तो आपोआप बरा व्हायचाच!—असा लोकांचा समज होता. पण ही प्रथा कांही वर्षापूर्वीच बद झाली.

या पांढऱ्या टेकाडावर दगडी पाये, मसाल्याच्या खंगार विटा आणि जुन्या मातीच्या भांडयांचे तुकडे विपुल प्रमाणात आढळतात. विटा फारच मजबूत आहेत.

यवतमाळला जाणाऱ्या सडकेला लागूनच हा उंचवटा आहे. सडकेकडील बाजूची पाहणी केल्यास मोठी नवलाई दृष्टीस पडते. ती अशी—ह्या मातीच्या थरांत एक इंचीचा थर कोळशाचा, तर त्यावर तेवढाच थर राखेचा, त्यावर पुन्हा एक कुजलेल्या

लाकडाचा, काळ्या मातीचा, हाडाच्या चुन्याचा असे निरनिराळे थर अलग अलग दिसून येतात

यावरून असें दिसतें की, या ठिकाणी मोठमोठ्या वास्तूची पडझड झाली असावी किंवा अग्नीत त्या भस्मसात तरी झाल्या असाव्या. पण हें सारे तर्कच आहेत भूतकाळाच्या पोटात काय रहस्य दडलेलें असेल, हें कुणी सांगावे ? त्यासाठीं एकच मार्ग आहे—तो म्हणजे अशा निवडक ठिकाणीं उत्खनन करणें. ह्या गोष्टीची नितांत आवश्यकता आहे पुराणवस्तु संशोधन खात्यानें या कार्याकडे लक्ष देऊन जर कळब गावी काहीं निवडक जागीं उत्खनन करून पाहिलें तर महत्त्वाचीं ऐतिहासिक साधनें उपलब्ध होतील, यात मुळींच संशय नाहीं.

### उत्सवाचे दिवस :

चिंतामणीचें मंदिरात माघ शुद्ध प्रतिपदेपासून तेथील उत्सवास प्रारंभ होतो. हा उत्सव सहा दिवस म्हणजे षष्ठी-पर्यंत चालतो हे सहा दिवस प्रत्येकानें वाटून घेतलेले आहेत तीन दिवस चिंतामणी संस्थानमार्फत होतात आणि बाकीचे तीन दिवस काही सद्गृहस्थानी स्वतःकडे घेतले आहेत

हे उत्सवाचे सहा दिवस भजन-पूजन, कीर्तन-पुराण, प्रवचन इत्यादि भरगच्च कार्यक्रमांनीं भरलेले असतात शेवटच्या दिवशी दहीहंडी फुटून काला होतो

संस्थानला काहीं शेतें बक्षीस दिलेलीं आहेत या जमि-नीचे वार्षिक उत्पन्न सुमारे एक हजार रुपये येतें. त्याचप्रमाणें समोरच्या चाळीचे भाडें दरसाल एक हजाराच्या आसपास येतें. या संस्थानचें वार्षिक उत्पन्न दोन हजार रुपयाचे आहे. त्यांतूनच देवस्थानाचा सर्व खर्च चालतो.

येथें उत्सवाचे निमित्तानें तर बाहेरगावचे लोक येतातच पण नेहमीच येथें कोणी ना कोणी देवदर्शनासाठीं येत असतात.

कोणी नवस करायला, तर कोणी नवस फेडायला म्हणूनहि. अशी जा ये चालूच असते. त्याचप्रमाणे पुणें, मुंबई यासारख्या दूर दूरच्या ठिकाणांहून काहीं गणेशभक्त येथें येऊन वर्षानुवर्षं राहतात; आणि चिंतामणीच्या सहवासात दिवस घालवितात..

## पूजेचें रमणीय दृश्य :

सकाळीं पाच वाजताच मी जागा झालों.

देवाच्या आंघोळीसाठी पाणी तापत होतें. या भल्या पहाटेला देवाचे चारपांच भक्त तेथें जमले होते. कोणी गंध उगाळीत होते, तर कोणी तुपात शेंदूर घोटीत होते. फुलांच्या माळा तयार होत होत्या.

पूर्वेला शुक्र उगवला होता.

आम्ही पाच सात मंडळी—त्यांत दोन तीन स्त्रियाहि होत्या—पायऱ्या उतरून खालीं गेलो काही जण स्नान करून आले होते. एका दोघानी मात्र तेथेंच कुंडाचें पाणी काढून स्नाने उरकली. नंतर आम्ही मंदिराच्या गाभाऱ्यांत प्रवेश केला. दोन बाजूला दोन समया तेवत होत्या शोडषोपचारे देवाची यथासांग पूजा चालू झाली. मूर्तीला सिंदूर लावला गेला. सारें आसमंत—' भगवंता, दयाघना, करुणानिधाऽऽन अशा मधून मधून उठणाऱ्या भाविकाच्या आरोळ्यानी भरून गेले. आणि शेवटी आरतीचे स्वर वातावरणात विरघळले

लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ॥
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटीं पावावें निर्वाणीं रक्षावें सुरवरवंदना ॥
जयदेव जयदेव जय मंगलमूर्ती ।
दर्शनमात्रें मनःकामना पुरती । जयदेव...

. .. दृष्टीपुढून फाफट पसारा नाहीसा झाला. मन मोहरून आलें आणि आतल्या प्रकाशाने मी दिपून गेलो

रम्य भाविकाळ :

चिंतामणीच्या कळंबचें भवितव्य उज्ज्वल आहे. इथले शेतकरी दिवसेदिवस सुखी नि सपन्न होत आहेत येथील बागायतीच्या धंद्याची भरभराट दृष्ट लागण्यासारखी होत आहे. इथला भाजीपाला दूरदूरच्या शहराना रवाना केला जातो. या गावाला लवकरच विजेची व्यवस्था होणार आहे मग काय? मातींतून सोनें निघाल्याशिवाय थोडेंच रहाणार! पूर्वींचें गेलेले वैभव कळंब परत मिळविल्याशिवाय रहाणार नाहीं. कारण–

" पूर्व दिव्य ज्यांचें त्यांना रम्य भाविकाळ ।
बोध हाच इतिहासाचा सदा सर्वकाल. ॥ "

* * *

ग्रंथ संग्रहालय
११८२५
REFBK C011425
REFBK-0011425





वोरा ॲण्ड कंपनी पब्लि.प्रा.लि.
मुंबई.